| | | |
|---|---|---|
| MHK0050032132022 | म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. १०३/२०२२ निशाण १२ खालील आदेश | प्रतिक्षा बलराम कोरे<br>वि.<br>बलराम मल्लापा कोरे |

१. प्रस्तुत अर्जाद्वारे वि.प.क्र.१ व ३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला म्हणणे नाही आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

२. वि.प. अर्जात कथन करतात की, यातील अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा पोटगी व इतर तत्सम बाबी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी वि.प. यांनी म्हणणे मुदतीत दाखल केले नाही म्हणून त्यांचेविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित केला आहे. वि.प. यांनी जाणून–बुजून म्हणणे दाखल करणेस विलंब केलेला नाही. वि.प. यांना म्हणणे देण्यास लागणारी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने म्हणणे वेळेवर देता आलेले नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत वकीलांना कागदपत्रे व माहिती देऊन म्हणणे दाखल करणे शक्य झाले नाही. सबब, वि.प.यांनी म्हणणे नाही असा झालेला आदेश रद्द करुन म्हणणे दाखल करण्याची परवानगी मागितली.

३. अर्जदाराने प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून हरकत नोंदविली आहे. अर्जदाराने अर्जातील संपुर्ण कथने नाकारलेली आहेत. अर्जदाराने असे कथन केले आहे की, अर्जातील संपूर्ण मजकूर धांदात खोटा व लबाडीचा आहे त्यामुळे मान्य व कबूल नाही. वि.प. हे जाणूनबुजून प्रस्तुतचे काम प्रलंबित करणेचे हेतूने म्हणणे देणेस विलंब केलेला आहे. त्यामुळे अर्जदाराने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली व मंजूर करणेस झालेस रक्कम रु. ५,०००/– खर्चाची मागणी केली आहे.

४. उभय पक्षकारांतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संपूर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. अवलोकनार्थ असे दिसून येते की वि.प. यांना म्हणणे देण्यासाठी विलंब झालेला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ व २००६ अन्वये दाखल केला असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत वि.प. यांनी म्हणणे दाखल करुन घेतल्यास अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वि.प.यांच्या अर्जातील कारण पाहता त्यांचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार आहे. म्हणणे देण्याची परवानगी वि.प. यांना देणे नैसर्गीक न्यायतत्वानुसार योग्य ठरेल. तसेच प्रस्तुतचा अर्जचा गुणदोषावर निकाल देणे न्यायालयास शक्य होईल.सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वि.प. क्र.१ व ३ यांना म्हणणे दाखल करण्यास त्यांच्या विरुध्द झालेला आदेश रद्द करुन त्यांचे म्हणणे स्विकारण्यात येते. तत्पुर्वी वि.प. यांनी अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये ५००/– अर्जदारास अदा करावेत.

Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Date: 2023.02.14 17:38:35 +0530

**इचलकरंजी**
**दिनांक –१४/०२/२०२३**

**(संजय दि. वानखेडे)**
**न्यायदंडाधिकरी प्रथमवर्ग, न्यायालय क्रं.५,**
**इचलकरंजी, जि.कोल्हापूर**